दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजश भांगे




बीड/महाराष्ट्र | शनिवार दि.८ मार्च २०२५ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष २ रे | अंक-१३२ | पाने ४ | किंमत ४ रुपये

## या महाराष्ट्राला कोणाची तरी दृष्ट लागली:एवढे क्रौर्य कुठून आले

# कुठल्या दिशेने चाललो आहोत आपण?

# छगन भुजबळांचा सभागृहात सवाल

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राष्ट्रवादीचे नेते व माजी मंत्री छगन भुजबळ यांनी विधानसभेत बोलताना राज्यपालांच्या अभिभाषणाचे स्वागत केले आहे. तसेच यावेळी मुख्यमंत्र्यांना त्यांनी महाराष्ट्र व कर्नाटक सीमाप्रश्नावर तोडगा काढण्याची विनंती केली आहे. तसेच महाराष्ट्रात सुरू असलेल्या गुन्हेगारीवरून छगन भुजबळ यांनी जोरदार हल्लाबोल केल्याचे पाहायला मिळाले.छगन भुजबळ यांनी पुढे बोलताना महाराष्ट्रात सुरू असलेल्या गुन्हेगारीवर देखील भाष्य करताना हल्लाबोल केला आहे. छगन भुजबळ म्हणाले, मागच्या काही दिवसांत महाराष्ट्रात ज्या घटना घडत आहेत, खरेतर संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. यंत्राचा, तंत्राचा, मंत्राचा हा महाराष्ट्र आपण म्हणतो. संतांचा हा महाराष्ट्र ज्ञानेश्वरांपासून तुकरमांपर्यंत. छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते संभाजी महाराजांचे पोवाडे आपण गातो, तो आपला हा महाराष्ट्र. या महाराष्ट्राला कोणाची तरी दृष्ट लागली.काही महिन्यातले काही प्रकरणे आहेत. बीडचे प्रकरण संतोष देशमुख, ते तर पहावत [illegible] याचा आपण सगळ्यांनी निषेध केला, जी काही कठोर शिक्षा व्हायला पाहिजे ती झालीच पाहिजे. परभणीमध्ये ज्या बाबासाहेब आंबेडकरांचे जे आहे तिथे असलेले संविधान, त्या संविधानाची मोडतोड केली, कोणी तरी केली म्हणून आंदोलन झाले. त्यात ज्याला पकडण्यात आले, सोमनाथ सूर्यवंशी नावाचा जो गृहस्थ आहे. तो पोलिस कस्टडीत मृत्यू पावला. त्याची आपण चौकशी करणार नाही? आणि मला आश्चर्य याचे वाटते की बीडच्या प्रकरणात जे आवाज उठवत होते ते म्हणतात जाऊद्या ते परभणीचे प्रकरण आपण त्यांना जाऊ देऊ. त्यांना माफ करा. पण का? ते माणसं नाहीत? तो मागासवर्गीय आहे म्हणून? दलित समाजाचा आहे म्हणून? माणूस माणूस आहे न? संविधान सगळ्यांसाठी सारखे आहे न? हा महाराष्ट्र माझा पण आहे मग आपण त्याच्यावर कारवाई नाही करणार? असा सवाल छगन भुजबळ यांनी उपस्थित केला आहे.पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, पुढची गोष्ट लातूरला प्रेम प्रकरणातून एका



धनगर समाजच्या मुलाची नखे काढण्यात आली, त्याचा मृत्यू झाला. आपण कोणी बोलणार नाही? दलित समाजाचा आहे म्हणून? हा महाराष्ट्र कुठे चालला आहे? जालन्यातले प्रकरण कैलास बोराडे, अन्वा भोकरदनचा तो शिव मंदिरात गेला म्हणून कोणी म्हणते जमिनीचा [illegible] होता म्हणून काहीही असेल, अरे धनगराचा तो मोणूस. अहिल्याबाई होळकर यांना पिंड घेऊन आपण दाखवतो, त्या समाजाचा हा माणूस त्याला ज्या पद्धतीने मारले आहे, कोळसे पेटवून त्यात लोखंडी रॉड गरम करून चटके देण्यात आले. त्याच्या गुद्वारामध्ये गरम सळई घुसवण्यात आली. धनगराचा माणूस आहे, आपण बोलायचे नाही? कोण करणार याचा निषेध? मला सरकारला दोष द्यायचा नाही, पोलिसांना दोष द्यायचा नाही. मला फक्त एवढेच म्हणायचे आहे की कुठे चालला आहे महाराष्ट्र?या महाराष्ट्रात एवढे क्रौर्य कुठून आले? काय आहे याच्या पाठीमागे? कोणत्या शक्त्या आहेत? याचा कधी विचार करणार आहोत की नाही आपण? आपण फक्त आरोप करणार, प्रश्नांची उत्तरे देणार आणि निघून जाणार. बस एवढेच काम आहे. महाराष्ट्रातला प्रत्येक गोरगरीब या सभेकडे डोळे लाऊन पाहतो की आम्हाला न्याय मिळेल. पण प्रश्न न्यायचा तोही नंतर पाहू. पण हे का होत आहे हे आपण पाहणार नाहीत? पक्षाचे जे नेते असतील त्या प्रभागातले, पत्रकार असतील काही लेखक असतील, काही विद्वान मंडळी असतील त्यांना बोलवा, सगळ्यांना एकत्र बसवा. हा राजकारणाचा प्रश्न नाही, हा विकासकामाचा प्रश्न नाही. या महाराष्ट्रातले जे क्रौर्य आहे हे कशा प्रकारे आपण थांबवणार आहोत, हे का निर्माण झाले? कधीपासून निर्माण झाले? कुठल्या भागात हे विषय वाढीला लागले आहेत? यावर चर्चा केली पाहिजे.आपण औरंजेबाचा निषेध केला, करायलाच पाहिजे. पण हा औरंगजेबीपणा या महाराष्ट्रात परत कसाकाय आला. बर हा एकच माणूस आहे का? कोळसे जमावणारे, कोळसे पेटवणारे, त्याला मारणारे, त्याला पालथे पाडणारे हे सगळे किती आहेत. ही महाराष्ट्राची संस्कृती नाही. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. विकास तर करायलाच पाहिजे. अमर्त्यसेन पण म्हणाले आहेत विकासाला माणसाचा चेहरा असला पाहिजे. पण माणूसच जनावरासारखा मारला जात असेल तर विकास कोणासाठी करायचा? असा सवाल छगन भुजबळ यांनी सभागृहात उपस्थित केला.

## प्रधानमंत्री जनऔषधी योजना गरजूंसाठी संजीवनी-खा.डॉ.अजित गोपछडे

**नांदेड । प्रतिनिधी**

देशातील वाडी तांड्यावरील गोरगरीब रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळाली पाहिजे. त्यांचे आरोग्य सुदृढ आणि सुकर राहिले पाहिजे. त्यांना स्वस्त दरात औषधी उपलब्ध झाल्या पाहिजेत . या उदात्त हेतुने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेली प्रधानमंत्री जन औषधी योजना ही गरजूंसाठी संजीवनी ठरली आहे . असे मत खा. डॉ. अजित गोपछडे यांनी व्यक्त केले.

डॉक्टर शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय विष्णुपुरी येथे आज प्रधानमंत्री जन औषधी योजनेच्या कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी अधिष्ठाता डॉक्टर सुधीर देशमुख यांच्यासह डॉ. कापसे , संजय मोरे, डॉक्टर सचिन उमरेकर ,दीपक कोठारी, धीरज स्वामी , डॉक्टर भारतीया आदींची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना खा .डॉ. अजित गोपछडे म्हणाले की, हिंदुस्थानातील तमाम जनतेच्या आरोग्याच्या कल्याणासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी असंख्य योजना




राबविल्या आहेत. एकीकडे सामाजिक विषमता मिटवून सर्व जनतेला नवकल्यानाच्या मार्गावर घेऊन जाण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व करत आहे.

याचवेळी आरोग्य सेवा ही मजबूत झाली पाहिजे . सर्वांना उत्तम आरोग्य सेवा मिळाली पाहिजे यासाठी ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली जन औषधी योजना लागू करण्यात आली आहे . एखादा गंभीर आजार झाल्यानंतर त्या आजाराच्या उपचारासाठी आपण घर , शेती विकतो .कर्जबाजारी होतो . तरी आपल्याला योग्य औषधी मिळतात का नाही याची शाश्वती नसते आणि त्यामुळे आपल्या कुटुंबातील एखाद्या व्यक्तीला प्राण गमवावा लागतो . ही बाब लक्षात घेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोणत्याही गरीब रुग्णाचे प्राण औषधी न मिळाल्याने जाऊ नयेत यासाठी जन औषधी योजना लागू केली आहे. रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी कोणताही गैरसमज मनात न ठेवता जण औषधी योजनेतील मेडिकलला जाऊन औषधी खरेदी करावेत. खाजगी दुकानात जाऊन महागड्या औषधी घेण्यापेक्षा सुरक्षित आणि दर्जेदार औषधी साठी जन औषधी केंद्रांना संपर्क करावा असे आवाहन त्यांनी केले.

## बीड एमआयडीसीबाबत आ.क्षीरसागरांनी घेतली मंत्री ना.उदय सामंतांची भेट

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या एमआयडीचा विकास व्हावा याकरिता गेल्या अनेक दिवसांपासून आ.संदीप क्षीरसागर शासन आणि प्रशासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करत आहेत. त्यातच गुरूवारी (दि.६) रोजी आ.संदीप क्षीरसागर यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान विधीमंडळात महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री ना.उदय सामंत यांची भेट घेतली.

बीड जिल्ह्याचा औद्योगिक विकास व्हावा याकरिता बीड शहरात स्थित असलेल्या औद्योगिक वसाहतीचा विकास होणे अत्यंत गरजेचे आहे. जेणेकरून त्याठिकाणी मोठमोठे उद्योग येतील आणि मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होईल तसेच आर्थिक स्थिती सुधारेल. ही बाब लक्षात घेऊन आ.संदी प क्षीरसागर गेल्या अनेक दिवसांपासून बीडच्या एमाआयडीसीच्या विकासासाठी पाठपुरावा करत आहेत. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी काही दिवसांपूर्वीच महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार



यांची भेट घेतली होती. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, प्रादेशिक अधिकारी आदी वरिष्ठ अधिकार्यांसमवेतही बैठका घेतल्या होत्या. आता पुन्हा यासंदर्भात, मुंबई येथे सुरू असलेल्या विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री ना.उदय सामंत यांची भेट घेतली आहे. दरम्यान याविषयी ना.सामंत यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच सविस्तर बैठक लावण्याचे सांगितले आहे.

## होळी निमित्त धावणाऱ्या पटना ते जालना विशेष गाडीच्या वेळेत बदल

**जालना । असलम कुरेशी**

दक्षिण मध्य रेल्वेने होळी निमित्त जालना ते पटना दरम्यान विशेष गाडीच्या सहा फेऱ्या करण्याचे घोषित केले आहे. यातील गाडी क्रमांक ०७६१२ पटना ते जालना विशेष गाडीच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. त्यामुळे ही गाडी नवीन वेळापत्रकानुसार धावेल. गाडी क्रमांक ०७६११ जालना ते पटना विशेष गाडीच्या वेळापत्रकात कोणताही बदल करण्यात आला नाही.

या विशेष गाड्या खालील तारखेप्रमाणे धावतील.गाडी क्रमांक ०७६११ जालना ते पटना विशेष गाडी ही गाडी जालना येथून दिनांक ०६, १० आणि १५ मार्च २०२५ ला रात्री २२.०० वाजता सुटेल आणि परतूर, सेलू, मानवत रोड, परभणी, पूर्णा, वसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, शेगाव, मलकापूर, बु-हानपूर, खंडवा, जुझार्पूर, इटारसी, पिपरिया. नरसिंघपूर,



मदन महल, कटनी, मल्हार सतना, मानिकपूर, प्रयागराज चावकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर, अरा, दानापूर मार्गे पटना येथे तिसऱ्या दिवशी सकाळी ०९:४५ वाजता पोहोचेल गाडी क्रमांक ०७६१२ पटना ते जालना ही विशेष गाडी पटना येथून दिनांक ०८, १२ आणि १७ मार्च २०२५ ला दुपारी १५.४५ वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच जालना येथे तिसऱ्या दिवशी सकाळी ०५:३५ वाजता पोहोचेल.

## जागतिक महिला दिनानिमित्त राज्यभर ‘विशेष ग्रामसभा’ महिला व बालविकास विभाग मंत्री आदिती तटकरे

**मुंबई । प्रतिनिधी**

महिला सक्षमीकरणाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून, बालविवाह होऊ नये यासाठी लोकचळवळ राबविणे महत्वाचे आहे. या अनुषंगाने महिला दिनानिमित्त राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात येणार आहेत, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.

मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले की, या विशेष ग्रामसभेच्या माध्यमातून महिलांच्या हक्कांसाठी व्यापक लोकचळवळ उभी रहावी, महिलांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रभावी धोरणे गावपातळीवर अंमलात यावीत आणि महिलांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना राबविल्या जाव्यात, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या विशेष ग्रामसभेमध्ये स्थानिक




प्रशासन, स्वयंसेवी संस्था, महिला बचतगट, अंगणवाडी सेविका, आशा सेविका आणि नागरिकांनी महिलांच्या उन्नतीसाठी पुढाकार घेण्याचे आवाहन मंत्री तटकरे यांनी केले आहे.महिला सुरक्षा, सक्षमीकरण आणि मुलभूत हक्कांसाठी लढा देण्याची महाराष्ट्राची ऐतिहासिक परंपरा आहे. राजमाता जिजाऊ माँसाहेब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्यातून प्रेरणा घेत आजच्या काळातही महिलांसाठी न्याय आणि सुरक्षा देणे तसेच प्रत्येक गाव आणि खेड्यापर्यंत महिला व बालकांसाठी असलेल्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी शासन प्रयत्नशील आहे. या विशेष ग्रामसभेच्या माध्यमातून बालविवाह, जाचक विधवा प्रथा, अन्यायकारक अंधश्रद्धा यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी तसेच मुलींच्या जन्मदर वाढीसाठी व्यापक जनजागृती केली जाणार आहे.

# खा.लंके यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर;मुंबई प्रतिष्ठानचा उपक्रम

**पारनेर । प्रतिनिधी**

येत्या १० मार्च रोजी साजऱ्या होणाऱ्या खासदार नीलेश लंके यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून कामोठे येथील नीलेश लंके प्रतिष्ठानच्या रविवार दि. ९ मार्च रोजी वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी सकाळी१० वाजता या रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात येणार असून सायंकाळी सहा वाजेपर्यंत हे शिबिर चालणार आहे. कामोठे येथील प्लॉट नं.२३ सेक्टर ९ येथील मा. आमदार दत्तूशेठ पाटील हायस्कुलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरात मोठया संख्येने सहभाग नोंदविण्याचे आवाहन नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे. मुंबई येथील नीलेश लंके प्रतिष्ठान हे विविध सामाजिक उपक्रमांमध्ये नेहमीच अग्रेसर असते. अलिकडेच प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दहीहंडी उत्सवास संपूर्ण मुंबई नगरीतून प्रतिसाद लाभला. मुंबई स्थित पारनेरकरांच्या मदतीसाठी मुंबई प्रतिष्ठान नेहमीच आघाडीवर राहिले आहे. प्रतिष्ठानमुळे मुंबईतील पारनेरकरांना एक हक्काचा खंबीर आधार असून प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी होऊन आपली सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम प्रतिष्ठानच्या माध्यमातून करण्यात येते. जगभर कोरोना महामारीमुळे भितीचे वातावरण असताना मुंबईस्थित पारनेरकरांना मदतीचा हात देण्यात प्रतिष्ठानचे शिलेदार आघाडीवर होते. कोरोना बाधित रूग्णांना उपचार, रूग्णालयात बेड उपलब्ध करून देणे, आवष्यक औषधे उपलब्ध करून देणे, लॉकडाउननंतर मुंबईस्थित पारनेरकरांना त्यांच्या गावी पोहचविण्यासाठीही प्रतिष्ठानच्या सदस्यांनी पारनेरकरांना मोठी मदत केली. खा. नीलेश लंके हे कोणत्याही व्यक्तीला मदतीचा हात देण्यासाठी अग्रभागी असतात. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवत त्यांचे सहकारीही सामाजिक कामात आपले कर्तव्य बजावत असल्याचे आजवर अनेकदा अनुभवण्यास मिळाले आहे. या शिबिरामध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास ५ लाख रूपयांचे विमा सुरक्षा कवच देण्यात येणार आहे. रक्तदात्यास अजीवन तर त्यांच्या नातेवाईकांना एक वर्षे मोफत रक्त देण्यात येणार आहे. रक्तदानासाठी येताना आधारकार्ड व पॅनकार्ड घेऊन येण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## संपादकीय..

# बेकायदा फलकबाजीवर जालीम उपाय कधी?



राज्याच्या सत्तेचा गाडा हाकणाऱ्या मंत्रालयाच्या परिसरात आजही मोठ्या प्रमाणात बेकायदा फलकबाजी पाहायला मिळते. विविध पक्षांच्या नेत्यांची छायाचित्रे त्यावर दिसतात. पण, त्यावर कारवाई होते का? तर बहुधा उत्तर नाहीच असे येईल. राज्यात बेकायदेशीर होर्डिंग्स आणि फलकबाजीचा मुद्दा हा काही नवा नाही. 'नेमेचि येतो पावसाळा' या उक्तीप्रमाणे गेल्या आठ-दहा वर्षांपासून उच्च न्यायालयाकडून वारंवार निर्देश दिले जातात, तेव्हा मात्र प्रशासनाला खडबडून जाग आलेली दिसते. मुंबईसह अनेक शहराचे आज जे विद्रुपीकरण झाले आहे, त्याला बहुतांशी ही होर्डिंग्सबाजी कारणीभूत ठरली आहे हे नव्याने सांगायला नको. तरीही 'नळी फुंकीले सोनारे इकडून तिकडून गेले वारे' याप्रमाणे प्रशासन तात्पुरता कारवाईचा फार्स करून मोकळे होते हीच प्रशासनाची रित राहिलेली आहे.

राज्यातील अनेक शहरातील रस्त्यांवर सध्या सण, उत्सव, धार्मिक, वैयक्तिक कार्यक्रमापासून ते अभिनंदन, आभार व अन्य विविध प्रकारच्या फलकबाजीने पुन्हा एकदा विद्रुपीकरण सुरू झाल्याचे दिसून येते. त्यामुळे फ्लेक्सबाजी विरुद्ध महापालिकेला आता पुन्हा कारवाईला कधी मुहूर्त मिळणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे. मुंबई उच्च न्यायालयात मंगळवारी पुन्हा या संदर्भातील याचिकेवर सुनावणी झाली, त्यावेळी 'फलकबाजीच्या तक्रारी आता पुऱ्या झाल्या. बेकायदा फलकबाजीच्या या गंभीर समस्येवर आम्हाला अंतिम तोडगा हवा आहे,' अशी कानउघाडणी उच्च न्यायालयाकडून राज्य सरकार, महापालिकेची करण्यात आली. मात्र, राज्य सरकारने या प्रकरणाशी आपला थेट संबंध नाही, हे पटवून देण्याचा खंडपीठासमोर प्रयत्न केला. या प्रकरणात पालिका प्रशासनाकडून कसे बोटचेपे धोरण अवलंबिले आहे, याचा पदार्फाश राज्य सरकारला करावा लागला. बेकायदा फलकांवर कारवाई करण्यासाठी महापालिकेच्या अधिकाऱ्यांना पोलीस संरक्षण दिले जाते; परंतु ही बेकायदा फलकबाजी राजकीय पक्षांतर्फे केली जात असल्यास महापालिकेने त्यांना जबाबदार धरावे, असे राज्य सरकारच्या वतीने महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी आता सुचवले आहे.

तसेच, एक फलक हटवल्यानंतर काही वेळाने लगेच दुसरा फलक लावला जातो. त्यामुळे, बेकायदा फलकबाजी हा उंदीर-मांजराचा खेळ झाला असल्याचेही सराफ यांनी खंडपीठाला सांगण्याचा प्रयत्न केला. यावेळी अवमान याचिका दाखल करणाऱ्या याचिकाकर्त्यांचे वकील उदय वारूंजीकर यांनी सुद्धा पालिका प्रशासनाकडे अंगलीनिर्देश केला होता. बेकायदा फलकबाजी करणाऱ्यांविरोधात एकही पालिका गुन्हा नोंदवत नाही. त्यात बेकायदा फलकबाजी करणाऱ्यांमध्ये राजकीय पक्षांचे नेते, पदाधिकारी आघाडीवर आहेत. या राजकीय पुढाऱ्यांनी बेकायदा फलकबाजी न करण्याची हमी देऊनही त्याचे पालन केलेले नाही, असे उदय वारूंजीकर यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या खंडपीठाने त्यानंतर राज्य विद्रुपीकरण प्रतिबंधक कायद्यांतर्गत काय काय कारवाई केली, किती जणांवर गुन्हे दाखल केले, त्यांची स्थिती काय हे स्पष्ट करणारे प्रतिज्ञापत्र पालिका प्रशासनाने दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. बेकायदा फलकांची समस्या खूपच गंभीर असून त्याबाबत तक्रारी करण्याऐवजी त्याला आळा घालणारे उपाय सुचवा, असे संतापून न्यायालयाला आदेश द्यावे लागले.

मुंबईत गेल्या वर्षभरात ४८ हजारांच्या आसपास बेकायदा फलकांवर कारवाई करण्यात आल्याचा आणि त्यातील २२ प्रकरणांत गुन्हा दाखल केल्याचा दावा महापालिकेने यापूर्वी झालेल्या मागील उच्च न्यायालयातील सुनावणीदरम्यान केला होता. त्यावेळीही कारवाई करण्यात आलेल्या फलकांच्या आणि गुन्हा दाखल करण्यात आलेल्या संख्येतील तफावतीवर बोट ठेवून ही कारवाई समाधानकारक आहे का, असा उपरोधिक प्रश्न न्यायालयाने महापालिकेला विचारला होता. बेकायदेशीर होर्डिंग्सबाबत स्वतंत्र धोरण तयार करत असल्याची माहिती राज्य सरकारने दिली होती. बेकायदेशीर फलकबाजीचा मुद्दा हा केवळ मुंबई-पुणे महापालिकेपुरता मर्यादित नाही, तर राज्यात ३८३ नगर पालिका, २६ महापालिकेला सतावत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून होर्डिंगच्या तक्रारीसाठी टोल फ्री नंबर दिला आहे. तरीही अनेक पर्यावरणवादी संघटनांकडून अशा होर्डिंग्सविरोधात लढा दिला जात आहे. या पार्श्वभूमीवर बेकायदेशीर होर्डिंग्सवर तक्रार करूनही कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार? याबाबतचा प्रश्नही मुंबई उच्च न्यायालयात उपस्थित झाला होता.

बेकायदा फलकबाजी करून शहरे बकल करणाऱ्या आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणाऱ्यांवर राज्य विद्रुपीकरण प्रतिबंधक कायद्यांतर्गत काय कारवाई केली आणि त्यांची सद्यस्थिती काय? याची माहिती यापुढे किती वेळा उच्च न्यायालयाला द्यावी लागणार आहे, हे प्रशासनालाच ठाऊक असे म्हणण्याची वेळ आली आहे. दुसऱ्या बाजूला, अहिल्यानगर महापालिकेत विनापरवाना भिंतीवर, सार्वजनिक मालमत्तेवर पोस्टर्स, बॅनर्स लावून विद्रुपीकरण करण्याचे प्रमाण वाढल्याचे दोन दिवसांपूर्वी झालेल्या स्वच्छता मोहिमेत लक्षात आल्यानंतर महापालिकेचे पालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी या मोहिमेत भाग घेत स्वतःहून भिंतीवरील पोस्टर्स काढून टाकले. शहरात विनापरवाना पोस्टर्स बॅनर्स लावून विद्रुपीकरण करणाऱ्यांवर थेट फौजदारी कारवाई करण्याचे आदेशही त्यांनी प्रभाग अधिकाऱ्यांना दिले आहेत. हाच फौजदारी कारवाईचा कित्ता राज्यातील इतर महापालिका गिरवतील का? हे आता पाहावे लागेल.

# स्त्री:माता तू,शक्ती तू,जीवन दायिनी!

स्त्री म्हणजे जन्म! स्त्री म्हणजे वात्सल्य, प्रेम, जिव्हाळा! स्त्री म्हणजे सौंदर्य! स्त्री म्हणजे क्रांती, स्त्री म्हणजे शांती! स्त्री म्हणजे नवनिर्माण! स्त्री म्हणजे जगण्याचे भान आणि जाण! स्त्री म्हणजे शक्ती! स्त्री म्हणजे भक्ती! स्त्री म्हणजे जीव धोक्यात घालून जगाला उपजवीणारी जगतजननी! स्त्री म्हणजे स्वच्छता! स्त्री म्हणजे माय, बहिण, पत्नी, कन्या आणि मैत्रीण सुद्धा! स्त्री म्हणजे घरपण आणि घरादाराचं दर्पण! स्त्री म्हणजे सर्वार्थाने सपर्पण! स्त्री म्हणजे डॉक्टर, स्त्री म्हणजे पहिला मास्तर (शिक्षक)! ती खडकावर मरूद्यान फुलवते, जीवाला जीव लावून घर तळहातावर झुलवते! तिच्यामुळेच आहेत भोवताल फिरणारी माणसं, तिनेच पहिल्यांदा उगवलेत वावरात कणसं! स्त्री म्हणजेच महामाणूस! आज आंतरराष्ट्रीय स्त्री दिनानिमित्त सर्वत्र स्त्रीचे गुणगान होतांना तिची गरिमा तेजोमय करण्यासाठी सर्वोपरी प्रयत्न केले जात आहेत, ही मोठी अभिमानाची बाब!




माय-बापहो, स्त्रीचा इतिहास मोठा देदिप्यमान आहे. मानवाच्या जन्माच्या विविध मिथकामध्ये तिला पुरुषापासून निर्माण केलेले दाखवले असले तरी; त्याला तर्कशुद्ध अधिष्ठान नाही. तिच्या निर्मितीच्या गोष्टी काहीही असो, मात्र तिने केलेल्या नवनिर्माणाच्या कथा मात्र थक्क करणाऱ्या आहेत. स्त्रीला पटलावरून पुसून टाकण्याचा अनेकवेळा प्रयत्न झाला असला तरी तिच्या कार्य कर्तृत्वाने तिच्या उज्वल इतिहासाची पाने जगाला आजही तेवढाच लख्ख उजेड देत आहेत. इतिहासात अनेक धुरंधर स्त्रियांनी फक्त घरकामादी क्षेत्र गाजवले नसून केवळ सौंदर्यच नव्हे तर पुरुषाच्या बरोबरीने युद्ध, शस्त्रास्त्र, बुद्धीचातुर्य, वाक्चातुर्य इत्यादी महत्वपूर्ण क्षेत्रात आपली ऐतिहासिक छाप सोडली आहे. अगदी पुराणातील गार्गी, मैत्रेयी पासून ते विद्यमान राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्यापर्यंत ती जीवनाच्या पटलावर पाय रोवून खंबीरपणे उभी आहे! प्रतारणा, उपेक्षा, छळ इत्यादीच्या बाबतीत पुरुष नावाच्या प्राण्याने मात्र तिच्या बाबतीत कळस गाठला आहे. इतिहासात स्त्री प्रधान संस्कृतीत ती एकदम केंद्रस्थानी होती. पती-पत्नी नावाची संकल्पना नसतांना स्त्री सर्वार्थाने स्वतंत्र होती. घर चालवणे एवढे क्षुल्लक काम तिच्यासाठी गौण होते. तिनेच इथल्या शेतीचा आणि विविध बि बियाण्यांचा शोध लावला. गाय, म्हैस, शेळीचे दुध माणसाला उपयोगी असून, या प्राण्यांना मायेने आपलेसे करून अगोदर अंगावरील आणि नंतर प्राण्यांचे दुध पाजून पुरुष नावाच्या प्राण्याला जगविले. ती सर्वप्रथम आणि शेवटीही सर्वांची आईच आहे!

जगात स्त्री प्रधान संस्कृतीने स्त्रीची जडणघडण मोठ्या ताकदीने झाली. काळाच्या पटलावर तिच्या पावलांचे ठसे आजही तेवढेच स्पष्ट आहेत. स्त्रीचा इतिहास मात्र मोठा भयंकर आहे. पूर्व वैदिक काळात केंद्रस्थानी असणारी स्त्री उत्तर वैदिक काळात बंदिस्त केली. स्त्रीसत्ताक बदलून परुष सत्ताक कुटुंब पद्धती रूढ झाली. पुरुषाने आडदांडपणाने स्त्रीला बंदिस्त केले. कर्मव्यवस्था बदलून वर्णव्यवस्था रुजवली. मनुस्मृती सारखे भेद निर्माण करणारे अमंगळ ग्रंथ पुढे आले. वर्ण व्यवस्था कठोर झाली. केंद्रस्थानी, मालकीण असणारी स्त्री वर्णव्यवस्थेने गुलाम बनली, अतिशूद्र गणली जाऊ लागली. पुरुषाची उपभोग्य वस्तू, सबलाची अबला केली. एवढेच काय स्त्री विनिमयाचे साधन बनली. मग पदर, नंतर घोषा आणि शेवटी सती प्रथेने ती पूर्णतः संपवली. येणाऱ्या पिढीतील स्त्रियांना या बाबींचा प्रचंड त्रास भोगावा लागला. हे सर्व बदलायला शेकडो वर्षे जावी लागली.

सतराव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांचा उदय झाला आणि स्त्री सुरक्षित झाली. जिजाऊ आईसाहेबांनी स्त्री आणि शेतकरी सुरक्षेसाठी शिवबांना तयार केले. कुळी कन्यापुत्र होती जे सात्विक सारखे स्त्री स्वातंत्र्य आणि सुरक्षेबाबत अभंग लिहून थोतांड, कर्मकांड, देवभोळेपणा, वर्णव्यवस्थेला कडाडून विरोध करत समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य तुकोबांच्या अभंगांनी केले. मराठी सत्तेचा अस्त होऊन पुन्हा पेशवाई आणि ब्रिटीश सत्तांनी धुमाकूळ घातला. त्यासाठी एकोणिसावे शतक उजाडावे लागले. ज्योतीराव-सावित्रीबाई या फुले दांपत्याने खऱ्या अर्थाने स्त्री शिक्षण आणि स्वातंत्र्याकरिता व्यवस्थेविरुद्ध दंड थोपटले. ब्राह्मणी वर्णव्यवस्थेला आव्हान दिले. एवढेच काय, पुण्यासारख्या सनातनी गावात मुलींची पहिली शाळा सुरु करून कृतीशील क्रांतीचे रणसिंग फुंकले. ब्राह्मणांचे कसब, सत्सार, गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसूड सारखे सडेतोड ग्रंथ लिहून प्रस्थापित व्यवस्थेला हादरे दिले. सार्वजनिक सत्यधर्म, सत्यशोधक समाज आदि विचारसरणी रूढ करून थोतांड, कर्मकांडाला तिलांजली देण्याचा विचार रुजवला. स्त्रीला स्वातंत्र्य मिळायला प्रारंभ झाला. त्याच काळात राजर्षी शाहू महाराजांनी आरक्षण आणि स्त्री सुधारणा राबवून आपली वेगळी, क्रांतिकारी ओळख निर्माण केली. पुढे स्त्री स्वातंत्र्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लेखन-भाषणाने कृतीशील कार्य केले. त्यांतर भारताला स्वातंत्र्य मिळाले. बाबासाहेबांनी भारतीय संविधानात स्त्रीला अनन्यसाधारण महत्त्व देतांना स्त्री-पुरुष समानता तत्व प्रकर्षाने रुजविले आणि खऱ्या अर्थाने ती पुन्हा स्वतंत्र झाली.

आज आपण संसदीय लोकशाहीची ७५ वर्षे ओलांडून शतकाकडे वाटचाल करत आहोत. देशाच्या सर्वांगीण विकासात स्त्रीचे योगदान अनन्यसाधारण आहे. पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून आज ती प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर झाली आहे. असे असले तरी जागतिक डब्ल्यू.एच.ओ.अहवालानुसार दररोज सरासरी ८०० स्त्रिया बाळंतपण आणि तत्सम बाबींमुळे मृत्यूला कवटाळतात. ही मोठी चिंतेची आणि विचार करण्याची गोष्ट आहे. त्यासाठी आज समाजात मोठ्या प्रमाणात जागृतीची गरज आहे. देशात सर्वत्र बालविवाहाचे कडक कायदे असतांना देशातील बालविवाह रोखण्यात इथली सरकारे अयशस्वी ठरली आहेत. आजही देशात मुलींचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाचे प्रमाण म्हणावे तेवढे वाढले नाही. बारावी नंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींची आकडेवारी पाहिली असता ही देशाची चिंता वाढवणारी बाब आहे. एकूण सरासरी १०० मुलींच्या मागे केवळ २० ते २४ टक्केच मुली पदवी शिक्षणापर्यंत पोहचत आहेत. ही आकडेवारी काय सांगते आहे? उर्वरित ८० ते ८६ टक्के मुली कुठे जातात? याचे उत्तर म्हणजे समाज त्यांच्यावर लग्न करून अकाली मातृत्व लादतो आहे. आजही समाज मुलीकडे एक माणूस म्हणून पहायला तयार नाही. ग्रामीण भारतात १४ ते १६ वय झालेल्या अल्पवयीन मुली आई-वडिलांना कुटुंबावर भार वाटतात. समाज मुलींना चूल आणि मुल, वाढा-रांधा-उष्टी काढा या पलीकडे पहायला आणि जाऊ द्यायला तयार नाही. इथली समाज व्यवस्थाच जर अशा जुनाट, रूढी-परंपरावादी बुरसटलेल्या विचारांनी ग्रस्त असेल तर स्त्रीचा उत्कर्ष कसा होणार? माय-बापहो, आज समाजाला उच्च शिक्षित स्त्रियांची नितांत गरज आहे. गर्भात खुडलेल्या कळ्यांचा तळतळाट समाज आज भोगत आहे. गावोगाव शेकडो अविवाहित तरुण सैराट फिरत आहेत. वंशाच्या दिव्याला वातच मिळाली नाही तर ज्योत कशी पेटणार? यासाठी आज समाजात शिक्षणाचे मूळ रुजवावे लागणार आहे. पदवी पूर्ण झाल्याशिवाय विवाह थांबवतांना हुंडा बंदच झाला पाहिजे. सुरक्षा वाढवून तिला शाळा-महाविद्यालयापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी प्रत्येकाला उचलावी लागेल. स्त्री शिकली तरच येणारा काळ सुकर होणार आहे, अन्यथा समाजाची अवस्था कठीण होईल! तेंव्हा चला, आपली आई, बहिण, पत्नी, कन्या, मैत्रीण इत्यादी शक्तीला बळ देऊन देश शक्तिशाली करूया!

**प्रा.डॉ.विठ्ठल खंडुजी जायभाये**
**कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय,सोनपेठ**
**जि. परभणी (महाराष्ट्र)**
**मो.९१५८०६४०६८**

# नियम पाळा अपघात टाळा!

गेल्या दहा वर्षात देशभरात झालेल्या अपघातात १५ लाख ३० हजारांहून अधिक अधिक नागरिकांचा मृत्यू झाल्याची आकडेवारी समोर आली आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाने ही आकडेवारी जाहीर केली आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाच्या संकेत स्थळावर ही आकडेवारी उपलब्ध असून त्यानुसार सण २०१३ ते २०२३ या दहा वर्षात रस्ते अपघातात बळी पडलेल्यांच्या संख्येत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. पहिल्या स्थानावर उत्तर प्रदेश तर दुसऱ्या स्थानावर तामिळनाडू ही राज्ये आहेत. २०२० ते २०२४ या काळात राज्यातील ४५ पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत १ लाख ५९ हजार रस्ते अपघात झाले असून त्यात ७१ हजार लोकांचा मृत्यू झाला आणि लाखो लोक गंभीर जखमी झाले आहेत. महाराष्ट्रासारख्या प्रगतशील राज्यासाठी ही आकडेवारी भूषणावह नाही. रस्ते अपघातात जर इतके लोक दरवर्षी मरण पावत असतील तर ती चिंतेची बाब आहे. विशेष म्हणजे यातील बहुतांशी मृत्यू हे २० ते ५० या वयोगटातील आहे. याचाच अर्थ रस्ते अपघातात सर्वाधिक मृत्यू हे तरुणांचे होत आहेत. ज्या तरुणांकडे देश भावी आधारस्तंभ म्हणून पाहत असतो तेच तरुण जर असे अकाली मृत्यू पावत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. केवळ सर्वसामान्य तरुणच नाही तर देशातील अनेक महनीय व्यक्तींचा मृत्यू देखील रस्ते अपघातात झाला आहे. तीन वर्षापूर्वी शिवसंग्राम पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आणि मराठा समाजाचे नेते विनायक मेटे यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठा समाजाचीच नव्हे तर राज्याची मोठी हानी झाली. त्यांच्या अपघाती निधनातून राज्य सावरत नाही तोच टाटा उद्योग समूहाचे माजी अध्यक्ष व प्रसिद्ध उद्योगपती सायरस मिस्त्री यांचे अपघाती निधन झाले. सायरस मिस्त्री यांचा गुजरातच्या अहमदाबादवरून मुंबईला जाणाऱ्या मार्गावर चारोटी जवळ सुर्या नदीच्या पुलावर अपघात झाला. सायरस मिस्त्री यांचे देशाच्या औद्योगिक विकासात महत्वाचे योगदान आहे. त्यांच्या निधनाने उद्योग विश्वात मोठी शोककळा पसरली होती. सायरस मिस्त्री, विनायक मेटे यांच्यासारख्या समाजातील महनीय व्यक्तींच्या अशा अकाली निधनाने समाजाचे मोठे नुकसान होत आहे. विनायक मेटे, सायरस मिस्त्री हे समाजातील महनीय व्यक्ती आहेत म्हणून त्यांच्या निधनाची बातमी झाली. रस्ते अपघातात दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यू होतो देशात सर्वात जास्त मृत्यू रस्ते अपघातात होतात. अपघातात जखमी आणि कायमचे जायबंदी होणाऱ्यांची संख्या तर अगणित आहे. विशेष म्हणजे यात तरुणांचा समावेश अधिक आहे. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत त्याच तरुणांचे अपघातात निधन होत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. अनेक प्रयत्न करूनही देशातील रस्ते अपघातांची संख्या का कमी होत नाही हा संशोधनाचा विषय आहे. वाढत्या रस्ते अपघातांना जितकी व्यवस्था जबाबदार आहेत तितकीच मानवी चुकाही जबाबदार आहेत. टोलच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची वसुली केली जात असतानाच महामार्गावर जीवघेण्या ब्लॅकस्पॉट मध्ये सुधारणा होत नाही. त्याचप्रमाणे रस्त्यांवरील खड्डे, धुळीचे साम्राज्य, महामार्गावरील अतिक्रमणे, सर्व्हिस रोडचा अभाव, रस्त्यावरच उभी केली जाणारी अवजड वाहने, बंद पडलेल्या वाहनांसाठी कमी पडत असलेली मदत केंद्रे, मोकाट जनावरे, अपुरे दुभाजक याबाबी अपघातांसाठी कारणीभूत ठरत आहेत. महामार्गावर वाहन चालकांकडून वेग मर्यादा पाळण्यात येत नाही. बहुतेक प्रवासी १०० किमी पेक्षा अधिक वेगाने वाहने चालवतात. ट्रक व इतर मोठ्या वाहनांकडून लेनची शिस्त पाळली जात नाही. काही वाहन चालक तर दारु पिऊन वाहने चालवतात तर काही वाहन चालक वाहन चालवत असताना मोबाईलवर बोलतात. वाहनांची व्यवस्थित निगा न राखणे, सीट बेल्ट न लावणे या गोष्टीही अपघातास कारणीभूत ठरतात. नियम माहीत असूनही चालक त्यांचे पालन करत नाहीत. सगळ्यांनाच कमी वेळात आपले ठिकाण गाठायचे असते. नियमांचे पालन न केल्यानेच अपघातांची संख्या कमी होत नाही. अपघातांची संख्या कमी करायची असेल तर वाहन चालकांना नियमांचे पालन करावेच लागेल. नियम पाळा अपघात टाळा!

**-श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# मनभेद,मतभेद आणि माणुसकी

नैसर्गिक घडण च अशी आहे की,व्यक्ती तितक्या प्रकृती,व्यक्ती तितक्या प्रवृत्ती आणि व्यक्ती तितके विचार.याचा अर्थ सारी माणसे सारखी नसतात.प्रकृती,प्रवृत्ती,विचार अलग अलग असतात,याचे कारण निसर्ग हा हवा पाणी अग्नी पृथ्वी आकाश या पंच महा भुतांच्या संयोगातून निर्माण झाला आहे.वनस्पती,पक्षी,जनावर,माणूस ही जीवसृष्टी ही निसर्गाचीच निर्मिती आहे.निसर्गाची प्रकृती ही शितगुनी,वातगुनी, उष्ण गुणी याचे मिश्रण आहे,याच प्रमाणे जीवसृष्टीचे आहे.माणसाच्या प्रकृतीत पण हे सित उष्ण वात आणि समशीतोष्ण हे नैसर्गिक गुण आले आहेत.जसे की आई वडिलांच्या प्रकृतीनुसार मुलाची प्रकृती बनत असते.म्हणून काही व्यक्ती उष्ण प्रकृतीचे,काही शीत प्रकृतीचे तर काहीजण हे वात प्रकृतीचे असतात.म्हणजेच ज्या व्यक्तीत उष्ण शीत वात ( वायू) या पैकी ज्याचे प्रमाण किंवा प्रभाव जास्त ती व्यक्ती त्या प्रकृतीची बनते.म्हनुन कुणी उष्ण प्रकृतीचे तर कुणी शीत प्रकृतीचे तर कुणी वात प्रकृतीचे असतात.पण प्रत्येकात हे तीनही गुण कमी अधिक प्रमाणात असतातच.या गुणांचे कमी अधिक प्रमाणानुसार त्याची प्रकृती बनते.आणि ज्याची जशी प्रकृती तशी त्याची प्रवृत्ती पण बनते.जसे की,ज्याची शरीर प्रकृती उष्ण आहे,तो पित्तप्रकृतीचा,ज्याची शरीर प्रकृती शीत म्हणजे थंड असते,तो शांत प्रकृतीचा,आणि ज्याची शरीर प्रकृती वयुयुक्त म्हणजे तो वात प्रकृतीचा असतो बनतो.आणि तीनही हे नैसर्गिक गुण म्हणजे पित्त शीत वात गुण समान असतात.ते समतोल प्रकृतीचे म्हणजे सात्विक गुणाचे असतात.माणसाची प्रवृत्ती ही या तीन गुणांनुसार बनत असते.प्रवृतीनुसार स्वभाव बनत असतो.जसे की,जो उष्ण प्रकृतीचा तो पित्तगुनी म्हणून तो अग्निगुनी म्हणजेच क्रोधी स्वभावाचा बनतो.शितगुणी ह्याचा स्वभाव शांत असतो.थंड असतो.वयुप्रकृतीचा माणूस समशीतोष्ण असतो.समतोल पण असतो.

प्रकृतीचा परिणाम जसा प्रकृतीवर होतो,त्यानुसार त्याचा स्वभाव म्हणजे क्रोध लोभ मन माया लोभ या विकृती,तसेच पित्त वात कफ च समतोल ज्याचेत तो सत्वगुनी,बनतो.म्हणजेच प्रकृतीनुसार माणसाचे मन बनत असते.आणि मनाचा स्वभाव हा चंचल असतो.त्यास स्थिर करणे,कंट्रोल करणे हे कठीण काम माणूस करू शकते,ते त्यात असलेल्या मेंदू मुळे.मेंदूतील बुध्दी मुळे.आणि बुद्दितील विवेकामुळे.

कुटुंबातील व्यक्ती,समूहातील व्यक्ती,गावातील,जातीतील,धर्मातील,देशातील व्यक्ती ही सारखी नसतात.म्हणजे विचाराने एक नसतात.व्यक्ती तितक्या प्रकृती म्हणून व्यक्ती तितुके स्वभाव,विचार अलग अलग असतात.तरी ते एकत्र असतात.कुतुंबचाचे ,समूहाचे संघटनेचे,गावाचे देशाचे म्हणजे सर्वांचे एकत्र राहणे ही काळाची गरज होऊन बसते,म्हणून माणसाने मनावर न सोडता सोपावता बुद्दीवर सोपवतो.तेही विवेकवर म्हणूनच कुटुंबात मतभेद असूनही सहजीवन जगत असतो.अनेकांचे अनेक स्वभाव,प्रकृती ,विचार असले तरी सगळ्यांची सहजीवनाची गरज लक्षात घेऊन किमान समान कार्यक्रम तयार करतात.आणि त्यावर ते ठाम राहतात.जसे की भारतात अनेक जातीचे धर्माचे पंथाचे विचाराचे लोक वास्तव्य करून असले तरी ते एकत्र राहतात,याचे कारण संविधान.आणि संविधनिक कायदे,आणि सर्व नागरिकांचा समान किमान कार्यक्रमावर एकमत .यामुळेच मतभेद ठेऊन ही मन भेद करायचा नाही.हा दृढ संकल्प केल्यामुळेच हे शक्य झाले आहे.कुटुंबातील व्यक्तीत मतभेद असले तरी मनभेद नसतात.म्हणूनच नाती टिकतात.मग ते नाती कुटुंबातील असोत की जातीची असोत की धर्माची असोत की देशाची असोत की मैत्रीची नाती असोत.ते टिकतात केवळ माणुसकी मुळे.

माणसाला आपण माणूस आहोत जनावर नाही याची जाणीव झाली की मग त्याला बुध्दीची जाणीव होते,आपली बुध्दी जनावरासारखी मर्यादित नाही,विचारला मर्यादा घालीत नाही,हे कळते,म्हणून माणूस जातीचा प्राणी विचारशील असतो.म्हणून सहजीवनाची कला माणसाला जमते.ती जनावराला नाही जमत.म्हणून त्यास कुटुंब घर गाव देश नसतो.माणसाला माणसाने माणसासारखे वागविले पाहिजे,असा साक्षात्कार जेंव्हा प्रत्येकाला होईल,तेंव्हाच तो माणुसकी जपू शकेल.माणुसकी हीच सर्वश्रेष्ठ आणि विकसित बुध्दीचे लक्षण आहे.माणूस ही जात आणि माणुसकी हा धर्म याची जाणीव होईल तेंव्हा मानवता धर्म विकसित होईल.बाकी सारे धर्म जाती आपोआपच काळाच्या पडद्याआड जातील.यासाठी एकच तत्व पाळले पाहिजे,ते म्हणजे तुकडोजी महाराजांचा उपदेश मतभेद होनेपर भी मनभेद हो ना पाये.. चला तर मग आपण आपली माणुसकी जागऊ या. जाती धर्माचे आपले विचार हे खाजगी समजून सार्वजनिक जीवन हे समृध्द करू या.

**दत्ता तुमवाड.सत्यशोधक**
**समाज नांदेड**
**फोन: ९४२०९१२२०९.**

# शेतकऱ्यांना चारा लागवडीसाठी हजार हेक्टर जमिनीस प्रशासकीय मान्यता द्यावी

## वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांच्या सूचना

**बीड । प्रतिनिधी**

शेतकरी स्वावलंबन योजनेअंतर्गत जिल्ह्यात गायरान जमिनीवर जाळा लागवडीसाठी हजार हेक्टर वर आहे याला प्रशासकीय मान्यता देण्यात यावी अशा सूचना स्वर्गीय वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड.निलेश हेलोंडे पाटील यांनी एका बैठकीत दिल्या.आपल्या बीड जिल्ह्याच्या दौऱ्यात या बैठकीत बीड तालुक्यातील पिंपळवाडी मधील मयत शेतकरी दादाराव बहिरवाळ यांच्या वारसांना त्यांनी यावेळी भेट दिली.सर्व शेतकऱ्यांना मदत व्हावी या दृष्टिकोनातून प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या कंपनी व प्रतिनिधीचे नाव आणि मोबाईल प्रत्येक ग्रामपंचायतीत फ्लेक्स द्वारे लावावा अशी सूचना त्यांनी या बैठकीत केली.

विदर्भ व मराठवाडा विभागातील शेतक-यांच्या आत्महत्या प्रकरणांची दखल घेऊन त्यावर तातडीची उपाययोजना करण्यासाठी व शेतक-यांना अन्न सुरक्षा, आरोग्य सेवा, शेती विकासाचे कार्यक्रम राबविणे व त्यांच्या मुलांना शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देणे अशा उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनची शासनाने नियुक्ती केलेली आहे. या अनुषंगाने कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ड निलेश हेलोंडे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मिशनसंबंधी जिल्हास्तरीय आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे संपन्न झाली. या बैठकीस जिल्हाधिकारी अविनाश पाठक, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख, जिल्हा कृषी अधिकारी विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.सदर बैठकीत अध्यक्ष यांनी खालीलप्रमाणे निर्देश दिले.उपजिल्हाधिकारी रोहयो, बीड यांनी गायरान जमिनीवर चारा लागवड करणेकामी १००० हेक्टरवर लागवड करण्यासाठी प्रशासकीय मान्यता द्यावी.

जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड यांनी प्रधानमंत्री पिक विमा योजना कंपनीच्या प्रतिनिधीचे नाव व मोबाईल क्रं. ग्रामपंचायत स्तरावर प्रसिध्द करण्यासाठी जिल्हयातील सर्व १०६५ ग्रामपंचायतींमध्ये प्रतिनिधींची नावे / सूचना डिजिटल फ्लेक्स स्वरुपात लावावेत.जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड यांनी शेतीच्या बांधावर जैविक प्रयोगशाळेची उभारणी करण्यासाठी मौ. खामगाव ता. गेवराई व डिघोळअंबा ता. अंबाजोगाई या ठिकाणी प्रत्येकी १० कॅम्प आयोजित करुन ५०० मास्टर ट्रेनर्स तयार करावेत.प्रेरणा प्रकल्पांतर्गत आरोग्य कर्मचारी यांनी घरोघरी जाऊन माहिती द्यावी. व आत्महत्याग्रस्त शेतक-यांचे कुटुंबियांना भेटी देण्यात याव्यात. व त्यांचे मानसिक स्वास्थ्याची काळजी घेणेबाबत निर्देश दिले. सर्व कृषी उत्पन्न बाजार समितींच्या व सर्व ग्रामपंचायतींच्या नोटीस बोर्डवर शेतीमालाचा भावफलक लावण्यात यावा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांनी शेतीमालाच्या आधारभूत किंमती बाबत व्यापक प्रसिध्दी द्यावी.सहआयुक्त, कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता




व नाविण्यता विभाग, बीड यांनी त्यांच्या विभागाच्या योजना तरुणाईला माहिती नसल्याने पुरेशी प्रसिध्दीद्वारे माहिती करुन द्याव्यात. सदर योजनेच्या माध्यमातून लाभ मिळेल असा प्रयत्न करण्यात यावा. शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद बीड यांनी शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या वारसांना स्पर्धा परीक्षेसाठी पुस्तके / वाचनालय उपलब्ध करुन द्यावे. मैदानी खेळांसाठी जिल्हा नियोजन समितीचा निधी वापरुन जिल्हयात किमान २५ मैदाने तयार करावीत. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड यांच्याकडे २२८ अर्ज प्राप्त झालेले असून, त्यामध्ये बँकेने ३५टक्के सबसिडी दिलेली आहे. तसेच ९९ अर्ज मंजूर केलेले आहेत. उर्वरीत प्रलंबित अर्जावर विनाविलंब कार्यवाही करावी. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांनी महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ अंतर्गत कलम १८ अन्वये सावकारकीमध्ये सावकारांनी बळकावलेली (रजीस्ट्री करुन घेतलेली) १८ प्रकरणात २३.७७ हे. आर. जमिन शेतक-यांना परत केली असल्याचे सांगितले. त्याबद्दल त्यांचे अध्यक्ष यांनी अभिनंदन केले. व उर्वरीत प्रकरणांमध्ये ३ महिन्यात निर्णय घेण्याचे सूचित केले. विभागीय वन अधिकारी यांनी वन्य प्राण्यांपासून शेतक-यांचे नुकसानीमुळे मोबदला मिळण्यासाठी ज्या क्षेत्रात वन्यजीव जास्त आहेत त्या ठिकाणी वन विभागाच्या योजनेबाबत जनजागृती करावी. आष्टी, पाटोदा, धारुर व वडवणी या तालुक्यांमध्ये जास्त वनक्षेत्र असून, तेथील व जिल्हयातील नागरिकांना जास्तीत जास्त योजनांचा लाभ देण्यात यावा. जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांनी अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत शेतक-यांना एप्रिल २०२३ पासून १५० रु. प्रमाणे एकूण ४९१२४ शिधापत्रिकाधारकांना २६ कोटी ९२ लक्ष रुपयांचे वाटप केलेले असल्याचे सांगितले. विस्तार अधिकारी कृषी जिल्हा परिषद बीड यांच्या कार्यालयामार्फत शेतक-यांसंबंधी आदिवासी विभागाच्या योजनेत २ शेतक-यांना लाभ देण्यात आला असल्याचे सांगितले. रेशीम विकास अधिकारी, बीड यांनी मागील वर्षी १२१६ मे.टन उत्पादन तसेच यावर्षी ५७०० एकरवर लागवड केलेली असल्याचे सांगितले. यासंबंधाने अध्यक्ष यांनी दि.०७.०७.२०२४ चा शासन निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत निर्देश दिले. वरीलप्रमाणे शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबाला विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणेबाबत निर्देशही कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ड निलेश हेलोंडे यांनी दिले.पक्षुच्या चा-यासंबधी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी पीपीटीव्दारे माहिती सादर केली तर कार्यक्रमाचे अभार प्रदर्शन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केले.

# डिजिटल मीडिया परिषदेच्या परळी तालुकाध्यक्षपदी नितीन ढाकणे कार्याध्यक्ष सय्यद सबाहत अली, उपाध्यक्ष अमोल सूर्यवंशी

**परळी । प्रतिनिधी**

मराठी पत्रकार परिषदेची सलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनीडिजिटल मीडिया परिषदेच्या परळी तालुकाध्यक्षपदी नितीन ढाकणे, कार्याध्यक्ष सय्यद सबाहत अली, उपाध्यक्ष अमोल सूर्यवंशी तर सचिवपदी शेख मुद्दसिर यांची निवड जाहीर केली आहे. परळी तालुक्यातील अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे तालुका समन्वयक धनंजय आरबूने, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे निमंत्रक जगदीश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी तालुक्यातील डिजिटल मीडिया परिषदेचे सर्व नवनियुक्त पदाधिकारी यांना यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.



सध्याच्या युगामध्ये प्रिंट मीडिया सोबतच डिजिटल मीडियाला अनन्य साधारण अस महत्त्व प्राप्त झाल्याने, या पुढील काळात प्रत्येक घटना आणि माहिती तात्काळ वाचक आणि प्रेक्षकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी आणि त्यासोबतच डिजिटल मीडियामध्ये काम करणाऱ्या प्रत्येक पत्रकारांच्या हितासाठी, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी डिजिटल मीडिया परिषद स्थापन केली आहे. त्यांच्याच नेतृत्वाखाली आणि डिजिटल मीडिया परिषदेचे राज्याध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी दिनांक ६ मार्च २०२५ रोजी डिजिटल मीडियाची परळी तालुका कार्यकारणी पुढील दोन वर्षासाठी जाहीर केली आहे. यामध्ये तालुकाध्यक्षपदी- नितीन ढाकणे, कार्याध्यक्ष- सय्यद सबाहत अली, उपाध्यक्ष अमोल सूर्यवंशी, सचिव- शेख मुद्दसिर, संघटकपदी- अभिमन्यू फड, सहसंघटक - मयूर आरबुने, तर कोषाध्यक्ष म्हणून - श्रीमंत खांडेकर यांचा समावेश आहे.बीड तालुक्यात यूट्यूब चैनल, इंस्टाग्राम, फेसबुक, ब्लॉग, व्हाट्सअप, पोर्टल, ऑनलाइन दैनिक यासह वेगवेगळ्या डिजिटल मीडियाच्या माध्यमातून शेकडो पत्रकार काम करत आहेत. त्यांना संघटित करून योग्य दिशेने आणि सुसूत्र पद्धतीने डिजिटल मीडियाचे काम व्हावे. त्यासोबतच या क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक पत्रकाराला सुरक्षा देऊन त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी डिजिटल मीडिया परिषद काम करत आहे. यासाठी परळी तालुका कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून पदाधिकाऱ्यांनी जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करावी असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी करून नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

# मुंबई महानगर प्रदेशात पैसे दिल्याशिवाय कोणीही आयुक्त बनू शकत नाही–सप आमदार रईस शेख

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई महानगर प्रदेशात पैसे दिल्याशिवाय कोणीही आयुक्त बनू शकत नाही. मुंबई महानगर प्रदेशाचा विकास झाल्याशिवाय महाराष्ट्र १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनू शकणार नाही, असे समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख यांनी राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलताना विधानसभेत सांगितले.

यावेळी बोलताना शेख म्हणाले की, मुंबई महानगर प्रदेशात पैसे दिल्याशिवाय कोणीही आयुक्त बनू शकत नाही. अशा स्वरूपाचा कारभार नगर विकास विभागात आहे. जे आयुक्त आले त्यांनी विकास आराखडा बनविला त्याचा प्रादेशिक विकास आराखड्यास कसलाही ताळमेळ नाही. फक्त दुकान उघडुन बसले आहेत. अशा स्वरूपाचे जर आपण शहरे निर्माण करत असू तर महाराष्ट्राचे १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे स्वप्न पूर्ण होऊ शकणार नाही, असे आमदार शेख यांनी यावेळी नमूद केले.

भिवंडी आणि मुंबई महानगर प्रदेशातील परदेशी गुंतवणूकदारांना गुंतवणूक करण्यासाठी अनुकूल आणि अद्ययावत अशा स्वरूपाच्या गरजेच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी मागील पाच वर्षापासून करतोय पण सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले आहे. जर सरकार ग्राउंड वरती उतरून काम करत नसेल तर राज्यपाल अभिभाषणातून जी स्वप्ने दाखविली ती स्वप्नेच राहतील, असेही आमदार शेख यांनी सांगितले.

यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की ठाणे ते कल्याण जाणाऱ्या मुंबई मेट्रो मार्ग ५ चे ९४ टक्के काम पूर्ण झाले असले तरी अजूनही सिस्टम इंस्टालेशन ची निविदा प्रक्रिया झाली नाही. मुंबई महानगर प्रदेशाचा विकास झाला तर महाराष्ट्र पुढे जाईल आणि पर्यायाने देश पुढे जाईल, असे आमदार शेख म्हणाले.

वस्त्रोद्योगविषयी बोलताना शेख यांनी महाराष्ट्राचा ६० टक्के व्यवसाय गुजरातला गेल्याचे सांगितले. एके काळी वस्त्रोद्योगसाठी महाराष्ट्र ओळखला जायचा. सरकारने याबाबत गंभीर पावले उचलणे गरजेचे आहे, असे शेख म्हणाले.

# TOT शिक्षक प्रशिक्षणाच्या चौथ्या टप्प्याचा समारोप



**केज । प्रातिनिधी**

आज दिनांक ७ मार्च रोजी केज तालुक्यातील भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालय केज येथे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य पुणे आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (ऊखएढ) अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ढजढअर्थात शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षण २.० च्या चौथ्या टप्प्याचा समारोप झाला . सदरील प्रशिक्षण हे ३ मार्च ते ७ मार्च पर्यंत चालले.

या प्रशिक्षणात इयत्ता पहिली ते पाचवी, सहावी ते आठवी आणि नववी ते बारावीला शिकवणाऱ्या शिक्षकांना प्रशिक्षित करण्यात आले. या प्रशिक्षणासाठी तालुक्यातील ३०० पेक्षा जास्त शिक्षक, शिक्षिका यांनी सहभाग नोंदवला होता. पाच दिवस चाललेल्या या प्रशिक्षणात दुपारचे जेवण व दोन वेळा चहा अशी उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. दि. ७ रोजी शेवटच्या सत्रात समारोपप्रसंगी ऊखएढ अंबाजोगाई चे ज्येष्ठ अधिव्याख्याता तथा प्रशिक्षण समन्वयक आदरणीय विजयकुमारजी सायगुंडे साहेब (उश्ररींी -१), अधिकारी, केज तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सन्माननीय श्री लक्ष्मणजी बेडसकर साहेब, प्रशिक्षणाचे सुलभक श्रीमती गीते मॅडम, श्री आरकडे सर, श्री माने सर , श्री बनकर सर ,श्री ढाकणे सर , श्री तरकसे सर, श्रीमती कोल्हे मॅडम, श्री लोकरे सर, सिरसट मॅडम , श्री डोईफोडे सर , श्रीमती कांबळे मॅडम, श्रीमती लहाने मॅडम, श्रीमती डॉ. नागरगोजे मॅडम, प्रशिक्षण व्यवस्थापनातील श्री सुनील कांबळे सर, विजय जोगदंड सर, श्रीमती बाराते मॅडम, सर्व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते .यावेळी प्रशिक्षण समन्वयक सायगुंडे साहेब , गटशिक्षणाधिकारी बेडसकर साहेब यांनी अनमोल मार्गदर्शन केले. प्रशिक्षणार्थी प्रतिनिधी श्रीमती शिंदे मॅडम, श्री धायगुडे सर यांनी प्रशिक्षणाविषयी मनोगत व्यक्त केले .या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री. अनिल चौधरी सर यांनी तर आभार प्रदर्शन श्री. हनुमंत चौधरी सर यांनी केले .

# एप्रिलमध्ये नगरच्या विस्तारित एमआयडीसीचे भूमिपूजन

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

नगर तालुक्यातील विळद येथे होणाऱ्या नवीन विस्तारित एमआयडीसीचे भूमिपूजन एप्रिल महिन्यात उद्योग मंत्री उदय सामंत आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत होणार आहे.



आज मंत्रालयात उद्योग मंत्र्यांच्या उपस्थितीत बैठकीत या भूमिपूजनाबाबत चर्चा झाली. या बैठकीस पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार मोनिकाताई राजळे, आमदार काशिनाथ दाते, डॉ. सुजय विखे पाटील, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि कामगार विभागाचे अधिकारी तसेच पारनेर तालुक्यातील प्रतिनिधी गणेश शेळके, सुजित झावरे, विजू आवटी, राहुल शिंदे, सचिन वरात आदी उपस्थित होते.

बैठकीत सुपा एमआयडीसीतील उद्योजकांच्या समस्या, वन विंडो सिस्टीम अंतर्गत सुलभ प्रक्रिया, तसेच एमआयडीसीच्या डेप्युटी सीईओ यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीबाबत निर्णय घेण्यात आला.उद्योग मंत्री उदय सामंत यांनी नगर जिल्ह्यातील शिर्डी, श्रीगोंदा आणि नवीन नगर एमआयडीसीमध्ये अधिक उद्योगधंदे आणण्याचे आणि रोजगाराच्या संधी वाढवण्याचे आश्वासन दिले. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्थानिक भूमिपुत्रांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी नवीन उद्योगांनी प्रयत्न करावेत, अशी विनंती केली.बैठकीदरम्यान काशिनाथ दाते यांनी आभार मानले, तर एप्रिलमध्ये पुढील बैठकीत उद्योगवाढीच्या अनुषंगाने आढावा घेतला जाईल, असे डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितले.

# नगर–पुणे रेल्वेमार्गाचा पुण्यात आढावा उपमुख्य अभियंत्यांसमवेत खा.नीलेश लंके यांची बैठक

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

नगर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी महत्वपुर्ण ठरणाऱ्या नगर-पुणे रेल्वे मार्गाला गती देण्यासाठी खासदार नीलेश लंके हे सातत्याने प्रयत्नशिल असून त्या अनुषंगाने त्यांनी या महत्वाकांक्षी प्रकल्पासंदर्भात पुण्यात रेल्वेचे उपमुख्य अभियंत्यांच्या कार्यालयात बैठक घेउन आढावा घेतला. लवकरच या प्रकल्पाच्या कामाला सुरूवात होईल असा विश्वास खा. लंके यांनी बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला. या महत्वाकांक्षी प्रकल्पासंदर्भात खासदार नीलेश लंके यांनी संसदेतही लक्ष वेधले होते. या मार्गाचे महत्व स्पष्ट करताना सुपा, रांजणगांव गणपती, कारेगांव या औद्योगिक वसाहती, रांजणगांव गणपती सारखी प्रसिध्द तिर्थक्षेत्रे व इतर अनेक विकासाच्या दृष्टीने महत्वाच्या ठिकाणांचा या मार्गात समावेश असल्याने निदर्शनास आणून दिले. प्रवासी वाहतूक आणि मालवाहतूकीसाठी हा मार्ग अत्यंत फायदेशीर ठरणार असून स्थानिक पातवळीवर मोठया प्रमाणावर औद्योगिक



वाढीस मदत होईल असा विश्वास खा. लंके यांनी व्यक्त केला. या महत्वपुर्ण बैठकीस रेल्वेचे उपमुख्य अभियंता मोहित सिंग यांच्यासह शाखा अभियंता व इतर अधिकारी, तांत्रीक पथक व स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते. नगर-पुणे रेल्वे मार्ग हा माझा ड्रीम प्रोजेक्ट आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी ही दर्जात्मक आणि गुणवत्तापुर्ण व्हाची यासाठी मी कटीबध्द आहे. या कामामध्ये काही अडचण आल्यास निःसंकोचपणे माझ्याशी संपर्क साधावा. आवष्यकता भासल्यास रेल्वेमंत्री महोदयांशी मी चर्चा करून प्रश्न माग लावण्याचा प्रयत्न करेल अशी ग्वाही खा. लंके यांनी या बैठकीत अधिकाऱ्यांना दिली. या प्रकल्पामुळे नगर व पुणे जिल्ह्यामधील सबंध अधिक मजबूत होणार असून औद्योगिक, धार्मिक आणि मजबूत होणार औद्योगिक, धार्मिक आणि सामाजिक प्रगतीचे नवे पर्व सुरू होणार असल्याच्या प्रतिक्रीया खा. लंके यांनी दिली. या रेल्वेमार्गासाठी भूसंपादन प्रक्रियेला वेग देण्याबरोबर सुपा येथे रेल्वे स्टेशन तसेच मालधक्का उभारणीची मागणी खा. लंके यांनी या बैठकीत केली. सुमारे १२५ किलोमीटर लांबीच्या या रेल्वेमार्गामुळे नगर व पुणे जिल्ह्यातील दळणवळण अधिक सुलभ होणार असून या भागातील नागरीक, उद्योग, शेतकरी,व्यापाऱ्यांसाठी हा प्रकल्प लाभदायक ठरणार आहे. नगर-पुणे रेल्वेमार्गासंदर्भात खा. नीलेश लंके यांनी पुणे येथे झालेल्या बैठकीत आढावा घेतला.

दैनिक वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक


# आरोग्यदूत बाजीराव चव्हाण यांच्या प्रयत्नाला यश

# गरजू रुग्णांना तेरा लाख नव्वद हजारांची वैद्यकीय मदत

## सर्वसामान्यांच्या मनातले आरोग्यदूत बाजीराव चव्हाण पुन्हा: रुग्णांच्या मदतीसाठी आले धावून

**बीड । प्रतिनिधी**

रुग्ण सेवा हीच खरी ईश्वर सेवा हे ब्रीदवाक्य आपल्या अंगी घेऊन लोकप्रिय उपमुख्यमंत्री मा. ना. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या विचारांना पुढे घेऊन जाण्याचं काम बीडचे भूमिपुत्र आरोग्यदूत बाजीराव चव्हाण हे महाराष्ट्रभर करत आहेत. महाराष्ट्राच्या तळागाळातील गरजू रुग्णांना एका हाकेला धावून जात बाजीराव चव्हाण यांनी आत्ता पर्यंत नऊ कोटी पेक्षा जास्त वैद्यकीय निधी आपल्या प्रयत्नांने मागील मुख्यमंत्री सहायत्ता निधीच्या माध्यमातून वाटप केलेला आहे. आणि आजही आपल्या बीड जिल्यासह महाराष्ट्रातील गरजू रुग्णांना अविरतपने अतूट प्रयत्नांने बाजीराव चव्हाण वैद्यकीय सहायता निधीच्या माध्यमातून निधी वाटप करत आहेत. बाजीराव चव्हाण यांच्या प्रयत्नातून वैद्यकीय मदत मिळालेल्या गरजू रुग्णांची माहिती पुढील प्रमाणे आहे.

१) मुक्ता बापुराव शेवाळे, नवजात बालक ५०, ००० रुपये मदत २ ) शहादेव पंढरीनाथ पाटील अपघात रुग्ण रु ५०,००० मदत ३) कोमल रोहिदास शिंदे, नवजात बालक रु ४०,००० मदत ४ ) माया सतिष तांबे केमोथेरिपी रु ५०,००० ५) पायल योगेश होळकर नवजात बालक रु ५०,००० ६) निकिता ज्ञानेश्वर खंदारे नवजात बालक रु ५०,००० ७) सुरज नारायण कल्ले अपघात रुग्ण रु १,००००० ८) आलि वाजिद शेख नवजात बालक १,००००० ९) राजु बापूराव कारविले अपघात रुग्ण १,००००० १०) रावसाहेब शंकर गंगावणे मेंदूरोग ५०,००० ११) रेणूका भगवान लाटे नवजात बालक ५०,००० १२ ) संध्या नानासाहेब काकडे नवजात बालक ५०,००० १३ ) लक्ष्मण बापुराव बोरवडे अपघात रुग्ण १,००००० १४)सविता गणेश बायस मेंदूरोग १,००००० १५) जिजाबाई शामराव पवार हिप रिप्लेसमेंट १,००००० १६)जिजाबाई बाबासाहेब बागल मेंदूरोग ५०,००० १७) सुमनबाई मधुकर राठोड केमोथेरिपी ५०,०००
१८ ) मयुर दिनकर बारगजे हिप रिप्लेसमेंट १,००००० १९) सागरबाई मच्छिंद्र भांड हिप रिप्लेसमेंट १,००००० २०)आर्चणा भागवत घाटुळ नवजात बालक ५०,००० या वरील सर्व गरजू रुग्णांना आरोग्यदूत बाजीराव चव्हाण यांच्या प्रयत्नांने मागील एक महिन्यात १३, ९०,००० रुपयांची वैद्यकीय मदत सपूर्द करण्यात आली आहे. बीड जिल्याचे भूमिपुत्र बाजीराव चव्हाण यांनी आरोग्याचे काम महाराष्ट्रभर चांगल्या पद्धतीने हाताळल्यामुळे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे त्यांच्या आरोग्य सेवेवर खुश असल्याचे बोलले जात आहे. त्यासह बीड जिल्यातील गरजू रुग्णांच्या सेवेत अहोरात्र २४ तास बाजीराव (दादा) चव्हाण कार्यरत असल्याने आणि हजारो सर्वसामान्य रुग्णांचे त्यांनी प्राण वाचवल्याने बाजीराव चव्हाण यांच्यावर महाराष्ट्रभरातून कौतुकाचा वर्षाव केला जात आहे.



# शेतकरी कीर्तन महोत्सवात शाश्वत शेतीवर चिंतन प्रसिद्ध कवी राऊत यांच्यासहमान्यवरांचा सहभाग

## तुकाराम महाराज शेतकरी बीज महोत्सवाला सोमवारपासून प्रारंभ!


**बीड । बालाजी जगतकर**

शेतकरी केंद्र बिंदू असलेल्या शेतकरी कीर्तन महोत्सवाच्या तिसऱ्या वर्षी शाश्वत शेती विषयावर दिग्गजांचे मार्गदर्शन मिळणार आहे. अध्यात्मिक चळवळीतू शेतकऱ्यांच्या मानसिक, शारीरिक आणि भौतिक विकासाला आकार देण्याचा प्रयत्न केला जात असून त्याला सर्व स्तरातून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. या वर्षी प्रसिद्ध कवी अनंत राऊत यांच्यासह अनेक मान्यवर या कीर्तन महोत्सवात मार्गदर्शन करणार आहेत.

तुकाराम महाराज बीजेचे औचित्य साधून २५ गावच्या शेतकऱ्यांनी एकत्र येऊन एक अनोखी अध्यात्मिक चळवळ सुरू केली आहे. कीर्तन, भजन या अध्यात्मिक उपक्रमाबरोबरच शेतकऱ्यांच्या मूलभूत प्रश्न या कीर्तन महोत्सवात मार्गदर्शक केले जाते. गेल्या वर्षी शेतकऱ्यांचे आरोग्यावर दिग्गज डॉक्टरांनी मार्गदर्शन करतानाच आरोग्य तपासणी केली होती. तर.या वर्षी शाश्वत शेतीवर चिंतन करण्यात येणार आहे. त्यासाठी अनेक तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

शेतक-यांना केंद्र स्थानी ठेऊन मागील दोन पासून परळी आणि धारूर तालुक्यातील तब्बल २५ पेक्ष्या अधिक गावातील शेतकरी आणि गावकरी यांनी तुकाराम बीज निमित्ताने सुरू केलेल्या शेतकरी

सोमवार दि १० मार्च रोजी सकाळी १०.०० वा कान्नापूर येथील बसस्थानक जवळ या शेतकरी कीर्तन महोत्सवाचे टाळ, वीणा, मृदंग पूजन जागतिक कीर्तीचे मृदंगाचार्य ह.भ.प. उद्धवबापू आपेगावकर व पंढरपूर येथील संत कैकाडी महाराज यांचे वंशज व मठाधिपती ह.भ.प. भरत महाराज जाधव यांच्या हस्ते होणार आहे. तर सायंकाळी नामवंत कवी अनंत राऊत, कामगार नेते डॉ.डी. एल कराड यांच्या उपस्थितीत या कीर्तन महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे.




शाश्वत शेती हा या वेळचा मुख्य विषय असून त्याबाबत जिल्हा कृषी अधीक्षक सुभाष साळवे, वनस्पती तज्ञ बशीर शेख, जलतज्ञ विजयअण्णा बोराडे, कृषी तज्ञ बालाजी लोहकरे, पीक पद्धती बदल तज्ञ इरफान शेख यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. सोबतच अध्यात्मिकेतून वैचारिक परिवर्तन करण्यासाठी विवेकी कीर्तनकार ह.भ.प. हरिदास महाराज तम्मेवार (अहमदपूर), ह.भ.प. एकनाथ महाराज माने (नारायण बाबा संस्थान, वांगी), ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज बंडगर (लेखक – होय होय वारकरी), ह.भ.प. डॉ.सुहास महाराज फडतरे (सातारा), ह.भ.प. डॉ. बालाजी महाराज जाधव (संभाजी नगर), ह. भ. प.गणेश महाराज फरताळे (अध्यक्ष शंभू राजे राज्याभिषेक सोहळा बडु बुद्रुक ) तर काल्याचे कीर्तन ह.भ. प.श्यामसुंदर महाराज सोन्नर (अध्यक्ष वारकरी विचार मंच, महाराष्ट्र) यांचे होणार आहे.

जगतगुरू तुकाराम महाराज यांच्या बीजे निमित्ताने आयोजित या कीर्तन महोत्सवात रोज सकाळ, संध्याकाळ एक गावातील घराघरातुन प्रसादरुपी भाकरी जमा करून कीर्तन महोत्सवात पंगत होणार आहे. या शेतकरी कीर्तन महोत्सवाचा लाभ सर्वांनी घ्यावा असे आवाहन मोहा, कांनापूर, म्हतारगाव, आमला, लीमला, कोयाळ, करेवाडी, वंजारवाडी, देवठाणा, मुंगी, गर्देवाडी, वाघाळा, नागपिंपरी, कावळेवाडी, सरफराजपूर, बोधेगाव, वाका, सिरसाळा, भिलेगाव, वडखेल, परचुंडी, मलनाथपूर, मांडेखेल, गोपाळपूर, माळहिवरा, तडोळी आदी गावच्या आयोजक गावकऱ्यांनी केले आहे.

# पत्रकार सचिन साखरे यांना आदर्श युवा पत्रकार पुरस्काराने सन्मानित



**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मौजे आवसगावचे भूमिपुत्र तथा परळी वार्ता चे जिल्हा प्रतिनिधी सचिन साखरे यांची दैनिक शिवजगार, विश्वनाथ फाउंडेशन यांनी महाराष्ट्र रत्न गौरवआदर्श युवा पत्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.२८ फेब्रुवारी रोजी सवित्रीबाई फुले स्मारक, संस्कृतिक भवन गंजपेठ पुणे येथे सुप्रसिद्ध अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड, सिने दिग्दर्शक ओमकार माने, मिसेस ग्लोबल इंडिया स्मिता राठोड, उद्योजिका सुजताताई चिंता यांच्यासह इतर मान्यवरनाच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.कार्यक्रमाचे संयजोक ऍड. शंकर शेषेराव चव्हाण विश्वनाथ फाउंडेशन, दैनिक शिवजगार इन्फोडाड यांनी केल आहे हे मागील अनेक वर्षा पासून सामाजिक, राजकीय, कला, संस्कृतिक, क्रीडा, पत्रकारिता, आदर्श ग्रामपंचायत, अशा अनेक क्षेत्रातील चांगले कार्य करणार्यांना पुरस्कार देऊन सन्मान करतात. त्यातील २०२५ वर्षीचा महाराष्ट्र रत्न आदर्श युवा पत्रकार पुरस्कार पत्रकार सचिन धनराज साखरे यांना मिळाल्या बदल त्याचे सर्व क्षेत्रातील हितचिंतक यांच्या अभिनंदन करण्यात येत आहे.

# केज,परळी,अंबाजोगाई येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या आढावा बैठका संपन्न




**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख मा. उद्धवजी ठाकरे यांच्या आदेशावरून आज दि.०६ मार्च २०२४ रोजी संपर्कनेते मा. सूनीलजी प्रभू मराठवाडा समन्वयक उपनेते विश्वनाथजी नेरुळकर उपनेत्या सुषमाताई अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली व बीड जिल्हा संपर्क प्रमुख मा. परशुराम जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकसभाप्रमुख मा.आ. सुनीलजी धांडे यांच्या उपस्थितीत तसेच बीड जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना महिला आघाडी युवासेना संवाद आढावा बैठका संपन्न झाल्या. सदरील बैठकीत पक्ष संघटनेचा आढावा, नवीन बांधणी, सदस्य नोंदणी तसेच पक्षवाढी संदर्भात महत्वपूर्ण चर्चा करण्यात आली.बैठकीला महिला आघाडी जिल्हाप्रमुख डॉ. नैनाताई सिरसट,युवासेना जिल्हाप्रमुख सोमेश्वर गित्ते, जिल्हासचिव रोहित कसबे, उपजिल्हाप्रमुख नारायण सातपुते, शिवाजी कुलकर्णी, दिपक मोराळे सह शिवसेनेचे जिल्हा पदाधिकारी, तालुका पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदरील बैठकीचे आयोजन परळी तालुक्यात तालुका प्रमुख भोजराज पालीवाल, शहरप्रमुख राजेश विभुते केज येथे तालुका प्रमुख अशोक जाधव, शहरप्रमुख तात्या रोडे, किशोर घुले, अंबाजोगाई येथे श्रीधर गरड, शहरप्रमुख अशोक हेडे यांनी केले होते.

## बीड जिल्हा शिवसेना (उबाठा) निदर्शने

# मुंबईतून मराठी राजभाषा हद्दपार करण्याचा भाजपाचा डाव–जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

**बीड । बालाजी जगतकर**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आज बीडमध्ये मुंबईतून मराठी भाषेला हद्दपार करण्याच्या भाजपाच्या डावाचा जोरदार निषेध केला. या निषेधाच्या अनुषंगाने, पक्षाचे सर्व पदाधिकारी, युवासेना, महिला आघाडी, किसानसेना तसेच शिवसैनिकांनी एकत्र येऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आक्रमक निदर्शने केली.

**भय्यूजी जोशी यांच्या वक्तव्याचा निषेध:**शिवसेनेने जाहीर केले की, मुंबईत मराठी भाषेसंबंधित केलेल्या भय्यूजी जोशी यांच्या वक्तव्याचा पक्षाच्या सर्व शाखांनी ठिकठिकाणी निषेध केला आहे. बीड शहरातील शिवसैनिकांनीही एकत्र येऊन या मुद्द्यावर निदर्शने करून आपली नाराजी व्यक्त केली.




दिवसाच्या मुख्य कार्यक्रमानुसार, ७ मार्च २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आयोजित केलेल्या या आंदोलनात पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार मराठवाडा संपर्क नेते सुनिल प्रभू, मराठवाडा समन्वयक विश्वनाथ नेरुळकर, आणि संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपाचा तीव्र निषेध करण्यात आला.

**उपस्थितीचा उत्साह**–या आंदोलनात सर्व आजी–माजी पदाधिकारी व शिवसैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. उबाठा शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांच्या नेतृत्वाखाली निदर्शने करण्यात आली त्यामध्ये समाजसेवक डॉ.गणेश ढवळे,गोरख अण्णा सिंघन,जिल्हा संघटक रतन तात्या गुजर ,जिल्हासहसचिव श्रीकृष्ण गायके,युवासेना बीड तालुका युवा अधिकारी गायके , उपतालुका प्रमुख दादासाहेब सोनवणे,उप तालुका प्रमुख अशोक सगळे,तालुका सचिव नंदकुमार येवले,किसान सेनेचे तालुका संघटक भिमराव कुटे, सर्कल प्रमुख दत्ता सुरवसे, सर्कल प्रमुख अशोक खांडे , माजी सरपंच सखाराम तात्या मोहीते ,उपसरपंच बाळासाहेब कुटे, उपसरपंच बाळासाहेब वरेकर , युवानेते मुकेश घुमरे , भगवान तावरे, मुन्ना जाधव,विलास शिरसाट,अभिषेक वरेकर,नितीन सोनकांबळे,सिद्धार्थ सोनकांबळे,विकास शिंदे,अशोक शिंदे,महेश काकडे,आकाश पांढरे,बाळू वरेकर,अशोक खांडे, भरत खरात,किरण पांढरे,अशोक वैद्य,अभय काळे, तावरे मामा,विलास क्षीरसट रमेश अप्पा आदी उपस्थित होते.

# चौसाळा येथिल हजरत चदंन शहावली ऊर्सच्या अध्यक्षपदी उपसरपंच अंकुश कळासे तर उपाध्यक्षपदी पवन कुचेकर सचिवपदी सलीम जहागिरदार व प्रा.सुधीर चौधरे

**चौसाळा । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील चौसाळा येथील हिंदु मुस्लीम एकतेचे प्रतीक असलेल्या हजरत चदंन शहावली ऊर्स निमित्त प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते सदरील बैठकीमध्ये अध्यक्षपदी चौसाळा शहराचे उपसरपंच अंकुश कळासे तर उपाध्यक्षपदी पवन कुचेकर तर सचिव पदी प्रा.सुधीर चौधरे,सलीम जहागिरदार तर कोषध्यक्षपदी त्रिबंक जोगदंड यांची एकमताने निवड करण्यात आली.यावेळी विविध कमिटीच्या निवडी जाहीर करण्यात आल्या मार्गदर्शकपदी सतीष(भाऊ)जोगदंड,मोहम्मद शरीफ सौदागर,श्रीमंत सोनवणे,सुधाकर गुजांळ,बळीराम राऊत,श्रीकांत शिंदे,श्रीराम नाईक ,बबन निनाळे,आमोल कांबळे,किशोर ढोकणे,पंजाब वाघमारे,विवेक कुचेकर तर सदंल कमिटीमध्ये अकबर जहागिरदार,मोहम्मद शरीफ सौदागर,जाकेर मुजावर,अजीम मुलानी,अरबाज मुलानी,इरशाद कुरेशी,फय्युम कुरेशी,खमर मुलानी,खलील मुजावर,अनवर शेख तर सांस्कृतीक कमिटीमध्ये विजयराजे शिंदे,अर्जुन चौधरे,पोपट कळसकर,मिराज मुलानी,महाविर सोनवणे,अमोल कांबळे,विलास ढोकणे,लखन जोगदंड,विवेक कुचेकर,शैलेश सोनवणे,दिपक जाधव,शेषेराव निनाळे,महादेव चौधरे तर कुस्ती कमिटीमध्ये सलीम कुरेशी,शहाजी जोगदंड,अंकुश सोनवणे,बिभिषण शिंदे,विवेक कुचेकर,नरहरी काशिद यांची एकमताने निवड करण्यात आली यावेळी नय्युम मामु कुरेशी,मिराज मुलानी,किशोर वाघमारे,प्रविण सोनवणे,बाबु देशमुख,सुरज सोनवणे,मिंलीद सोनवणे,अमोल शेटे,पंजाब सोनवणे,चंदु चौधरी,मुज्जु जहागिरदार,अजिनाथ नाईकवाडे,अस्लम जहागिरदार,जुबेर कुरेशी,अमन मुलानी,मोहम्मद कुरेशी,अलिम मुलानी,मोमीन मुजावर,अजहर कुरेशी यांच्यासह चौसाळा शहरातील प्रतिष्ठीत नागरिक,डॉक्टर,पत्रकार, नागरिक मोठया संख्येने उपस्थीत होते.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077